**प्रेस नोट** **दिनांक २२/०५/२०२६**

## सायबर पोलीस ठाणे, पश्चिम विभाग, गु.शा., गु.अ.वि., बांद्रा, मुंबई

## समाजमाध्यमांमध्ये खोटी माहिती प्रसारित करणाऱ्यांविरूध्द सायबर पोलीसांची कडक कारवाई

आज दिनांक २२/०५/२०२६ रोजी असे निदर्शनास आले कि, बांद्रा पुर्व, मुंबई येथे शासनाकडून केलेल्या निष्कासन कारवाईबाबत सोशल मिडिया प्लॅटफॉर्म X (ट्विटर) वर एका वापरकर्त्याधारकाने खोटया व तत्यहिन पोस्ट प्रसिद् केले आहे. सदर X (ट्विटर) वापरकर्त्याने इलेक्ट्रॉनिक माध्यमाचा वापर करून सार्वजनिक शांततेचा भंग करण्याच्या व जनतेमध्ये भिती निर्माण करण्याच्या उद्देशाने खोटी व तथ्यहिन माहिती प्रसारित करून दोन समाजात जाणीवपुर्वक तेढ निर्माण होवून त्यांच्यामधील सामाजिक सलोखा बिघडविणे अशा उद्देशाने हे कृत्य करण्यात आले आहे.

या प्रकरणी X (ट्विटर) चा वापरकर्ता व संबंधित व्हिडिओ रेकॉर्ड करणारा व्यक्ती यांच्या विरूद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये सायबर पोलीस ठाणे, पश्चिम विभाग, गु.शा., गु.अ.वि., बांद्रा, मुंबई गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**<u>मुंबई पोलीसांचे नागरीकांना आवाहन :</u>**

याव्दारे नागरिकांना सुचित करण्यात येते की, अशाप्रकारे कोणतीही खोटी व तथ्यहिन माहिती पसरविणे हा कायदयाने गुन्हा असून कोणीही अशाप्रकारे माहिती सोशल मिडीया व इतर माध्यमांव्दारे प्रसारित करून कायदा व सुव्यवस्था यामध्ये बाधा निर्माण करण्याचा प्रयत्न करेल, त्यांचेवर प्रचलित कायदयाव्दारे कारवाई होवू शकते. तरी याव्दारे नागरिकांना मुंबई पोलीसांकडून आवाहन करण्यात येते की, नागरिकांनी सोशल मिडीया प्लॅटफॉर्मचा वापर अत्यंत काळजीपुर्वक करावा. त्याव्दारे कोणतीही चुकीची माहीती प्रसारित करू नये शेअर किंवा फॉरवर्ड करू नये व त्याव्दारे कोणाच्या धार्मिक भावना दुखावणार नाहीत याची दक्षता घ्यावी.